अर्धसाप्ताहिक

# ब्रम्हपुरी समाचार

संपादक
अशोक भैया

RNI No. MAHMUL/2016/69789

E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com

Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25

गुरूवार, दि. 22 जानेवारी 2026 | वर्ष 11 वे | अंक 23 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

# ब्रम्हपुरी शहरात काँग्रेस पक्षाचा "पॉवर शो"

## पाच विषय समित्यांवर सभापतींची निवड; विकासासाठी नवे 'शिलेदार' सज्ज

ब्रम्हपुरी /का.प्र.

ब्रम्हपुरी नगरपालिकेच्या २०२५ च्या सार्वत्रिक निवडणुकीत ऐतिहासिक यश मिळवल्यानंतर, काँग्रेस पक्षाने आता नगरपालिकेच्या प्रशासकीय यंत्रणेवर आपली मजबूत पकड निर्माण केली आहे. मंगळवार, दिनांक २० जानेवारी २०२६ रोजी पार पडलेल्या विशेष सभेत नगरपालिकेच्या पाच अत्यंत महत्त्वाच्या विषय समित्यांच्या सभापतींची अधिकृत निवड



नितिन उराडे
सार्व. बांधकाम सभापती



मनोज कावळे
सार्व. आरोग्य सभापती



सचिन राऊत
नगररचना व
नियोजन सभापती



सतिश हुमने
पाणीपुरवठा व
जलनिःसारण सभापती



बबिता आमले
महिला व
बालकल्याण सभापती

करण्यात आली. यामुळे शहराच्या विकासकामांना आता नवी दिशा आणि वेग मिळण्याचे संकेत मिळत आहेत.

नवनिर्वाचित नगरसेवकांची पहिली सभा संपन्न झाल्यानंतर, जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार पीठासन अधिकारी तथा मुख्याधिकारी डॉ. माधुरी सलामे यांनी ही विशेष सभा बोलावली होती. या सभेमध्ये

(उर्वरित पान क्र. ६ वर)

# गर्दीचा फायदा घेत महिलेचे पावणे चार लाखांचे दागिने लंपास

## ब्रम्हपुरी बसस्थानकावरील घटना

ब्रम्हपुरी/प्रतिनिधी

तोरगाव (बु.) येथून आपल्या गावी परत जाणाऱ्या एका महिलेच्या हॅन्डबॅगमधून अज्ञात चोरट्याने ३ लाख ७७ हजार ५०० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने, मोबाईल आणि रोख रक्कम पळवल्याची खळबळजनक घटना ब्रम्हपुरी बसस्थानक परिसरात घडली आहे. याप्रकरणी पुष्पा हिरालाल प्रधान (५३, रा. बरडकिन्ही) यांनी ब्रम्हपुरी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली आहे.





मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी पुष्पा प्रधान या १७ जानेवारी रोजी आपल्या बहिणीसोबत माहेरी तोरगाव (बु.) येथे गेल्या होत्या. दोन दिवस माहेरी राहिल्यानंतर, सोमवार दि. १९ जानेवारी रोजी दुपारी ३:०० वाजताच्या सुमारास त्या तोरगाव वरून ब्रम्हपुरीकडे येणाऱ्या बसमध्ये बसल्या. निघताना त्यांनी आपल्या हॅन्डबॅगमधील एका काळया रंगाच्या पर्समध्ये ३० ग्रॅम वजनाचा सोन्याचा कंठमणी व लॉकेट असलेले मंगळसूत्र, एक सॅमसंग कंपनीचा कीपॅड मोबाईल आणि दोन हजार रुपये रोख असा मुद्देमाल ठेवला होता. दुपारी ३:४५ वाजताच्या सुमारास बस ब्रम्हपुरी बसस्थानकावर पोहोचली. यावेळी बसमध्ये प्रवाशांची मोठी गर्दी होती. बसमधून उतरल्यानंतर अवघ्या १० मिनिटांत त्या पुढील प्रवासासाठी बोरमाळा बसमध्ये बसल्या. बसमध्ये तिकीट काढण्यासाठी त्यांनी हॅन्डबॅग उघडली असता, बॅगची चैन अर्धवट उघडलेली दिसली. त्यांनी तातडीने तपासणी केली असता आतील काळी पर्स गायब असल्याचे त्यांच्या लक्षात आले.

चोरट्याने गर्दीचा फायदा घेत अत्यंत शिताफीने बॅगची चैन उघडून सोन्याचे दागिने

(उर्वरित पान क्र. ६ वर)





## श्रीमती गोदावरीदेवी मोहता यांचे दुःखद निधन

ब्रह्मपुरी/का.प्र.

येथील मोहता कुटुंबातील ज्येष्ठ सदस्या आणि प्रतिष्ठित व्यक्तिमत्व श्रीमती गोदावरीदेवी मोहता यांचे आज बुधवार, दिनांक २१ जानेवारी २०२६ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ९७वर्षांच्या होत्या. त्यांच्या निधनाने मोहता परिवारावर शोककळा पसरली असून परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.



गोदावरीदेवी मोहता या ब्रह्मपुरीतील नामवंत उद्योजक श्याम सुंदर मोहता आणि दुर्गादास मोहता यांच्या मातोश्री होत. प्रेमळ आणि सुसंस्कारी व्यक्तिमत्व म्हणून त्या परिचित होत्या. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे आणि मोठा आप्तपरिवार आहे. त्या कमलेश, तुषार, निलेश, लक्ष्मीकांत, नीरज आणि सूरज मोहता यांच्या आजी होत.

त्यांची अंतिम यात्रा काल बुधवार, दिनांक २१ जानेवारी २०२६ रोजी, दुपारी १:०० वाजता काढण्यात आली. चांदगाव रोड येथील त्यांच्या राहत्या निवासस्थानावरून ही अंत्ययात्रा निघून त्यांचेवर स्थानिक स्मशानभूमीत अंत्यसंस्कार केले गेले. त्यांना ब्रम्हपुरी समाचार परिवारातर्फे भावपूर्ण आदरांजली!

## संपादकीय...

# बेरोजगारीचे संकट

सक्षम व्यक्तीला सक्रियपणे रोजगार शोधत असताना तो मिळत नाही तेव्हा त्याला बेरोजगार म्हटले जाते. यात केवळ नोकरी नसलेलेच नाही तर कौशल्य असतानाही काम मिळत नसलेले लोकही मोडतात. मागील काही वर्षांपासून देशात बेरोजगारी हा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. ही बाब देशाच्या सर्वांगीण विकासातही बाधा निर्माण करणारी आहे. कोणत्याही अर्थव्यवस्थेला तेव्हा संतुलित मानले जाते जेव्हा त्यात आर्थिक विकासासोबत रोजगाराच्या नव्या संधीही निर्माण होतात. ग्रामीण आणि शहरी भागात एकूण मनुष्यबळ आणि लोकसंख्येचे प्रमाण लक्षात घेतले तर भारत जगातील रोजगाराची आवश्यकता असलेला सर्वात मोठा देश आहे. येथील तरुण वर्ग अन्य देशांच्या तुलनेत अधिक आहे. मात्र या मनुष्यबळाला अन्य व्यापकपणे राष्ट्राच्या उभारणीत समान संधी मिळत नाही, याची कल्पना केंद्रीय सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाच्या अलीकडे जाहीर करण्यात आलेल्या अहवालातून येते.

देशात पंधरा वर्षे आणि त्यापेक्षा अधिक वयाच्या नागरिकांच्या बेरोजगारीचा दर मागील वर्षी डिसेंबर महिन्यात वाढून ४.८ टक्के झाला. नोव्हेंबर महिन्यात हे प्रमाण ४.७ टक्के होते. या कालावधीत शहरी क्षेत्रात बेरोजगारीचे प्रमाण अधिक होते. त्याचा दर नोव्हेंबर महिन्यात ६.५ टक्क्यांवरून ६.७ टक्के झाला होता, असे या अहवालात म्हटले आहे. त्यातून हे स्पष्ट होते की, सरकारी आणि खासगी क्षेत्रातील संघटित आणि असंघटित भागात रोजगाराच्या संधींमध्ये घट होते आहे. बेरोजगारीचा दर हा बेरोजगार लोकांची संख्या भागिले एकूण कामगार यांच्या गुणोत्तराने मोजला जातो. बेरोजगारी ही एक मोठी सामाजिक समस्या संपूर्ण जगातील अर्थव्यवस्थांना भेडसावणारी समस्या आहे. आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या तसेच विकसनशील देशांमधील ही गंभीर आणि मूलभूत समस्या आहे. एकीकडे शैक्षणिक सुविधा वाढत आहेत, तर दुसरीकडे सुशिक्षित बेरोजगारांची संख्या ही झपाट्याने वाढत आहे. त्यातून नैराश्य वाढते ही सर्वात क्लेशदायक आणि दुर्दैवी बाब आहे.

बेरोजगारीवर उपाय म्हणून कौशल्य विकास, शिक्षण आणि उद्योजकतेला प्रोत्साहन, लघु उद्योगांना मदत, कृषी क्षेत्राचा विकास आणि सरकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी यांसारखे अनेक उपाय आहेत, ज्यात सरकार आणि नागरिकांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे. यात कौशल्य आधारित शिक्षण, स्टार्टअप्सना प्रोत्साहन, पायाभूत सुविधांचा विकास आणि ग्रामीण रोजगाराच्या संधी वाढवणे यावर लक्ष केंद्रित केले जाते. रोजगाराचे प्रमाण वाढवण्याच्या दृष्टीने सरकारच्या वतीने आत्मनिर्भर भारत आणि स्कील इंडिया यासारख्या योजना सुरू करण्यात आल्या आहेत. मात्र त्याचा प्रभाव वेगवेगळ्या क्षेत्रात वेगवेगळा असल्याचे दिसून येते.

वास्तविक कोणत्याही देशाचा संपूर्ण आर्थिक विकास तेव्हाच होऊ शकतो जेव्हा सकल्य घरेलू उत्पादनात वाढ होते. म्हणजेच दरडोई उत्पन्न तसेच गरिबी, उपासमार आणि सामाजिक असमानता कमी होते आणि रोजगारांची उपलब्धता होत प्रत्येक व्यक्ती समाधानाने जगू लागते. विकासाचे प्रारूप असे असले पाहिजे की, ज्यात रोजगाराच्या संधी गरिबीचा बीमोड आणि शेतकऱ्यांची समृद्धी निश्चित होईल. तसेच महागाईचा दरही कमी असेल. केंद्र सरकारने सन २०४७ पर्यंत विकसित भारताचे लक्ष्य निर्धारित केले आहे. मात्र सध्याच्या परिस्थितीत ते निर्धारित कालावधीत गाठले जाईल का, हा खरा प्रश्न आहे. अशा परिस्थितीत सरकारने विचार केला पाहिजे की बेरोजगारीचा दर घटवण्यासाठी शिक्षणाला कौशल्य आधारित विकासासोबत कसे जोडता येईल. त्याला प्रथमता देता येईल आणि सरकारी तसेच खासगी क्षेत्रात रोजगारासाठी नव्या संधी कशा निर्माण करता येतील. ते साध्य करता आले तरच भारत खऱ्या अर्थाने एक विकसित राष्ट्र होण्याच्या दिशेने वाटचाल करू शकेल.

# शासकीय जागेवर अतिक्रमणधारकाची वाकडी नजर

## ब्रम्हपुरी नगर पालिकेच्या कारवाईला केराची टोपली!

ब्रह्मपुरी/का.प्र.

शहरात एकीकडे स्वच्छतेच्या आणि शिस्तीच्या गप्पा मारल्या जात असताना, दुसरीकडे शासकीय जमिनींवर भूमाफिया आणि अतिक्रमणधारकांनी आपले पाय पसरण्यास सुरुवात केली आहे. ब्रह्मपुरी-कुर्झा मार्गावरील मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलींच्या शासकीय वसतिगृहाशेजारी असलेल्या मोकळ्या भूखंडावर एका अतिक्रमणधारकाने पुन्हा एकदा ताबा मिळवला असून, यामुळे प्रशासकीय यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

ब्रह्मपुरी-कुर्झा मार्गावर मुलींचे शासकीय वसतिगृह आहे. या वसतिगृहाच्या सुरक्षेच्या दृष्टीने आजूबाजूचा परिसर मोकळा आणि सुरक्षित असणे आवश्यक आहे. मात्र, याच वसतिगृहाच्या बाजूला असलेल्या खुल्या शासकीय जागेवर एका इसमाने बेकायदेशीरपणे तारांचे कंपाउंड घालून अतिक्रमण केले आहे. धक्कादायक बाब म्हणजे, या तारेच्या कुंपणाच्या आत आता 'खोपड्या' बांधून जागा हडपण्याचा पद्धतशीर प्रयत्न सुरू झाला आहे.

### पालिकेची कारवाई ठरली फार्स

**काही काळापूर्वी ब्रह्मपुरी नगरपालिकेने या परिसरात 'अतिक्रमण हटाओ' मोहीम राबवून येथील बांधकामे जमीनदोस्त केली होती. नगरपालिकेने ही जागा रिकामी केल्यामुळे नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला होता. मात्र, प्रशासनाचा हा धाक अवघ्या काही दिवसांतच फोल ठरला आहे. संबंधित अतिक्रमणधारकाने पुन्हा एकदा त्याच जागेवर कुंपण घालून प्रशासनाला खुले आव्हान दिले आहे. यामुळे नगरपालिकेची कारवाई केवळ कागदोपत्री किंवा 'दिखाव्या' पुरतीच होती का, असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.**

एका बाजूला शासकीय वसतिगृहात राहणाऱ्या मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न असताना, अगदी लागूनच अशा प्रकारे बेकायदेशीर वस्ती वाढणे चिंताजनक आहे. वारंवार अतिक्रमण होऊनही पालिका गप्प का? अतिक्रमणधारकाला कोणाचे राजकीय वरदहस्त लाभले आहेत? शासकीय जमिनीची राखण करण्याची जबाबदारी नगरपालिका विसरली आहे का? असे अनेक बोचरे प्रश्न आता उपस्थित केले जात आहेत.

शासकीय जागा हडपण्याचा हा डाव वेळीच हाणून पाडावा, अशी मागणी परिसरातील सुज्ञ नागरिकांनी केली आहे. जर तातडीने हे तारांचे कुंपण आणि झोपड्या हटवल्या नाहीत, तर भविष्यात ही जागा कायमस्वरूपी अतिक्रमणधारकाच्या घशात जाण्याची भीती व्यक्त होत आहे. आता ब्रह्मपुरी नगरपालिका प्रशासन या 'पुनरावृत्ती' झालेल्या अतिक्रमणावर काय कारवाई करते, याकडे लक्ष लागले आहे.

# जितेंद्र बेले यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

ब्रम्हपुरी/का.प्र.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र (SCERTM), पुणे द्वारा



शिक्षणक्षेत्राशी संबंधित शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांचेतील कौशल्य व नवकल्पना विकसित करण्याच्या उद्देशाने सत्र २०२५-२६ पासून 'शिक्षक व अधिकारी/कर्मचारी स्पर्धा' चे आयोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, नागपूर येथे घेण्यात आलेल्या विभागस्तरीय 'MS-PPT' सादरीकरण स्पर्धेत नेवजाबाई हितकारिणी कन्या विद्यालय ब्रम्हपुरी येथे कार्यरत असणारे जितेंद्र रमेश बेले यांनी आपल्या अभ्यासपूर्ण सादरीकरणाने परीक्षकांची व उपस्थितांची मने जिंकत यश संपादन केले व राज्यस्तरीय स्पर्धेकरिता आपली निवड निश्चित केली.

'MS-PPT' सादरीकरणांमध्ये वर्ग दहावीचा 'भूगोल'मधील 'स्थान व विस्तार' विस्तार या पाठावर विद्यार्थी केंद्रित MS-PPT चे उत्कृष्ट सादरीकरण व कौशल्याने योग्य न्याय देत विद्यालयाचे नाव नागपूर विभागात उंचावले. विद्यार्थ्यांना अधिक समजावं व त्यांना चांगले गुण मिळावे यासाठी ते सदैव प्रयत्नशील राहतात.

जितेंद्र रमेश बेले यांची राज्यस्तरीय स्पर्धेकरिता निवड झाल्याबद्दल ने. भै. हि. शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती स्नेहलताबाई भैया, सचिव अशोकजी भैया, सहसचिव ॲड. भास्करराव उराडे, सदस्य प्रा. सुभाषजी बजाज, सदस्य गौरवजी भैया व संस्थेचे सर्व पदाधिकारी यांचेसह मुख्याध्यापिका बनपूरकर मॅडम, उपमुख्यधापक निखारे सर, पर्यवेक्षक खंडाते मॅडम तथा शिक्षकवृंद यांनी अभिनंदन केले आहे.

## विनोदिनी

सायकॉलॉजीच्या अधिवेशनात एक प्रश्न विचारण्यात आला...

'प्रत्येक पती आपल्या पत्नीशिवाय दुसऱ्याच्या पत्नीकडे का पाहतो...?'

संपूर्ण सभागृहात सन्नाटा पसरला...

बराच वेळ गेला.. मग...

मग आपल्या गावचा रामु जो नुकताच सायकॉलाजी शिकायला शहरात आला होता... तो हात वर करून उभा राहिला... त्याचे उत्तर ऐकून सर्वजण अवाक् राहिले... त्याने एक अतिशय लॉजिकल उत्तर दिले...

"माणसाची ही जुनीच सवय आहे. तो नेहमीच दुसऱ्यांच्या चुका पाहतो... स्वतःच्या नाही."

# ने.हि. विद्यालयाचे शिक्षक लक्ष्मण मेश्राम यांचे राज्यस्तरीय स्पर्धेत दैदीप्यमान यश

## राज्यस्तरीय व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन स्पर्धेत चमकदार कामगिरी

ब्रम्हपुरी/का.प्र.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र (SCERTM), पुणे द्वारा शिक्षणक्षेत्राशी संबंधित शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांचेतील कौशल्य व नवकल्पना विकसित करण्याच्या उद्देशाने सत्र २०२५-२६ पासून 'शिक्षक व अधिकारी/कर्मचारी स्पर्धा' चे आयोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबई द्वारा घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय 'व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन स्पर्धे'त नेवजाबाई हितकारिणी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, ब्रम्हपुरी येथील सहा. शिक्षक लक्ष्मण गोविंदा मेश्राम यांनी आपल्या अभ्यासपूर्ण सादरीकरणाने राज्यातील दहा उत्कृष्ट शिक्षकांमध्ये स्थान मिळवले आणि राज्यस्तरीय स्पर्धेचे पारितोषिक विजेते होण्याचा बहुमान प्राप्त केला.



राज्यस्तरीय 'व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन स्पर्धेमध्ये लक्ष्मण गोविंदा मेश्राम यांनी 'दहावी/बारावी नापास विद्यार्थ्यांसाठी करिअरच्या संधी' हा महत्वाचा विषय हाती घेतांना राज्य मंडळाच्या आठ विभागातील शिक्षक स्पर्धकांमध्ये आपल्या अभ्यासपूर्ण, नियोजनबद्ध व उत्कृष्ट सादरीकरण कौशल्याने यशस्वी झेप घेत विद्यालयाचे, जिल्ह्याचे व विभागाचे नाव राज्यात उंचावले. विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेचे सातत्याने मार्गदर्शन करणारे स्पर्धा परीक्षेचे जाणकार व्यक्तिमत्व लक्ष्मण मेश्राम हे विद्यालयातील अधिकारी वर्गाच्या पाठिंब्यामुळे व सहकारी शिक्षकांच्या सहकार्याने विविध विभागातील प्रशासकीय अधिकारी यांचे मार्गदर्शन कार्यक्रम विद्यालयात आयोजित करित असतात. लक्ष्मण मेश्राम यांच्या मार्गदर्शनात अनेक विद्यार्थ्यांनी आपले करिअर घडवले आहे. अनेक विद्यार्थी वेगवेगळ्या शासकीय नौकरी मधे रुजू झाले आहेत.

लक्ष्मण मेश्राम यांचे राज्यस्तरीय स्पर्धेतील यशाबद्दल नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेच्या अध्यक्ष श्रीमती स्नेहलताबाई भैया, सचिव अशोकजी भैया, सहसचिव ॲड. भास्करराव उराडे, सदस्य प्रा. सुभाषजी बजाज, सदस्य गौरवजी भैया व संस्थेचे सर्व पदाधिकारी यांचेसह ने.हि. विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य के. एम. नाईक, उपप्राचार्य ए. डब्ल्यू. नाकाडे, पर्यवेक्षक प्रा. पी.आर. जीभकाटे तथा शिक्षकवृंद व प्रशासकीय कर्मचारीवृंद यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# लॉयन्स क्लब ब्रम्हपुरीद्वारे नि:शुल्क मोतीबिंदू तपासणी व कृत्रिम भिंगारोपण शस्त्रक्रिया शिबीर

ब्रम्हपुरी/का.प्र.

लायन्स क्लब ब्रम्हपुरी व ब्रम्हपुरी ग्रामिण बिगरशेती सहकारी पत संस्था ब्रम्हपुरी यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ०१ फरवरी २०२६ रोज रविवारला मोतीबिंदू तपासणी व कृत्रीम भिंगारोपन शस्त्रक्रियेचे शिबिर आयोजीत करण्यात आले आहे.

लायन्स क्लब इंटरनॅशनल हि जागतीक स्थरावरील अराजकिय सामाजिक संस्था असून तिचे ४६००० क्लब आहेत व १४ लाख एकूण सदस्य आहेत. लायन्स क्लब ब्रम्हपुरी तर्फे वर्षभर अनेक सामाजिक उपक्रम राबविण्यात येत असतात. आयोजीत करण्यात आलेले मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिर हे २५ वे शिबीर आहे. क्लब हया वर्षात २५ वर्षे पूर्ण करीत आहे.

शिबिराकरीता कस्तुरबा हॉस्पीटल सेवाग्राम तर्फे वैद्यकिय सहकार्य लाभणार असून शिबीराचे आयोजन स्थानिक मदरपेट्स स्कूल देलनवाडी वार्ड येथे घेण्यात येईल. रुग्णांची नोंदणी सकाळी ११ वाजेपासून ते दुपारी ०१ वाजेपर्यत करण्यात येईल. निवड झालेल्या रुग्णांना सेवाग्रामला जाणे-येणे निवास, भोजन व शस्त्रक्रिया विनामुल्य करण्यात येईल.

हया संधीचा जास्तीत जास्त लोकांनी फायदा घ्यावा असे आवाहन लॉयन्स क्लबचे अध्यक्ष गणेश समृतवार, वसंत कावळे व पतसंस्थेचे अध्यक्ष अनिल दोनाडकर यांनी केले आहे.

# ट्विंकल इंग्लिश स्कुलमध्ये 'खरी कमाई' उपक्रम

नागभीड/प्रतिनिधी

समिधा सेवा संस्था द्वारे संचालित श्रीमती रामप्यारीदेवी आसारामजी काबरा ट्विंकल



इंग्लिश स्कूल, नागभीड येथे भारत स्काऊट व गाईडच्या वतीने 'खरी कमाई' हा उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला. विद्यार्थ्यांमध्ये स्वावलंबन, श्रमप्रतिष्ठा व उद्यमशीलतेचे मूल्य रुजविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमासाठी शाळेच्या प्रशस्त प्रांगणात विद्यार्थ्यांनी स्वत: तयार केलेले पोहे, उपमा, भेळ, वडापाव, सँडविच, लिंबूपाणी, मिठाई आदी विविध खाद्यपदार्थ विक्रीसाठी मांडले होते. विक्री, ग्राहकांशी संवाद, हिशोब व नियोजन यांचा प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थ्यांनी उत्साहाने घेतला. सदर कार्यक्रम संस्थेचे अध्यक्ष गणेश तर्वेकर व संस्थेचे सचिव अजय काबरा यांच्या प्रमुख मार्गदर्शनात घेण्यात आला. प्रसंगी शाळेच्या प्राचार्या शुभांगी पोहेकर, मुख्याध्यापिका संगीता नारनवरे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत, 'शालेय जीवनात अशा उपक्रमांमधून विद्यार्थ्यांना जीवनोपयोगी कौशल्यांचे धडे मिळतात,' असे सांगितले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी स्काऊट-गाईड शिक्षिका रूपा ताडूरवार, क्रीडा शिक्षक गणेश लांजेवार तसेच महेश जीभकाटे यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी कार्यक्रम शिस्तबद्ध व नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडला. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी शाळेतील शिक्षकवृंद व पालकांचेही सहकार्य लाभले. 'खरी कमाई' या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंद, उत्साह व नवचैतन्य दिसला.

# एलएमबी पब्लिक स्कुलचे विद्यार्थी लोकमत कुपन स्पर्धेचे मानकरी



ब्रम्हपुरी/का.प्र.

लोकमत पेपर तर्फे लकी ड्रॉ काढण्यात आला. यामध्ये एल.एम.बी. पब्लिक स्कुलच्या विद्यार्थ्यांना प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकाचे पारितोषिक देऊन विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले. लोकमत लकी ड्रॉमध्ये भाग घेण्याऱ्या विद्यार्थ्यांना पेपर पॅड प्रमाणपत्र, शिल्ड व लंच बाक्स, धन राशी देऊन गौरविण्यात आले.

त्याचप्रमाणे लोकमत पेपर वाचन करणे का आवश्यक आहे? पालकांनी आपल्या घरातील मुला-मुलींकरिता लोकमत घरी का सुरू करावा ? आजूबाजूच्या घटना समाजात काय घडतंय याकडे लक्ष जात आणि संवेदनशीलता वाढते. लोकमतमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या लेखामुळे ज्ञान अधिक व्यापक होते. शिक्षण आरोग्य शेती उद्योग अशा क्षेत्रात कसा उपयोग होतो याची ओळख मिळते. नवोन्मषी कल्पना आणि वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित होतो. बदलत्या जगाशी जुळवून घेण्यासाठी आवश्यक डिजीटल कौशल्यांची जाणीव होते. तंत्रज्ञानातील आव्हानाची आणि संधीची जाणीव होऊन निर्णयक्षमता वाढते. रोजचे वाचन मेंदूची एकाग्रता विश्लेषणात्मक विचार आणि समज शक्ती अधिक सक्षम करते. म्हणूनच प्रत्येक विद्यार्थ्यांने १५ मिनिट पेपर वाचन करायला पाहिजे. स्पर्धा परिक्षांच्या तयारीसाठी लोकमत वृत्तपत्र वाचने अत्यंत उपयुक्त ठरते. या स्पर्धेच उद्देश ठेवून विद्यार्थ्यांनी लोकमत पेपर वाचनाची आवड निर्माण करावी, असे मार्गदर्शन करण्यात आले.

# विद्यार्थ्यांसाठी नियमित बस सुरू करा - भाकप

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी तालुक्यातील मुडझा, हळदा, आवळगाव परिसरातील अनेक विद्यार्थी शिक्षणाकरिता ब्रम्हपुरी येथे येतात. यामध्ये कामगार, शेतकरी, शेतमजूर यांचीच मुले असून घरच्या आर्थिक कारणामुळे त्या विद्यार्थ्यांना किरायाने खोली करणे शक्य होत नसल्याने सर्व विद्यार्थी बस द्वारे ये-जा करतात. मुडझा वरून ९.३० वाजता ब्रम्हपुरी कडे जाणारी बस आहे. मात्र, ही बस सर्व प्रवाशांसाठी असल्याने सदरच्या बसमध्ये प्रमाणाच्या बाहेर प्रवासी व विद्यार्थी यांची गर्दी होत असल्याने विद्यार्थ्यांना बस मध्ये प्रवास करणे शक्य होत नाही. कधी कधी विद्यार्थ्यांचे १/२ पिरियड जातात तसेच ब्रम्हपुरी वरून ५ वाजता सुटणारी बस अशाच प्रकारची असल्याने बस मध्ये अत्यंत गर्दीचा सामना करावा लागतो.



तेव्हा विद्यार्थ्यांसाठी मुडझा ते ब्रम्हपुरी व ब्रम्हपुरी ते मुडझा ही बस फक्त विद्यार्थ्यांकरिता सुरू करा, या मागणीचे निवेदन भारतीय कम्युनिष्ट पक्षाचे जिल्हा सहसचिव विनोद झोडगे यांनी आगार व्यवस्थापक ST महामंडळ ब्रम्हपुरी यांना दिला आहे. येत्या ७ दिवसात बस सुरू न झाल्यास विद्यार्थ्यांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी विनोद झोडगे यांनी दिला.

निवेदन देताना मिलिंद भन्नारे, मोहिनी मेश्राम, राधा घोडमारे, श्रेया लाडसे, समीक्षा मस्के, ट्विंकल भोयर, गायत्री उकरे, खुशाली ठाकरे, घनेश्वरी उकरे, प्रतिक्षा लोळे यासह बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

# अनोळखी इसमाचा मृतदेह आढळला

ब्रह्मपुरी/का.प्र.

येथील बोंडेगाव-कुर्झा मार्गावर सोमवार, १९ जानेवारी रोजी सकाळी ५५ वर्षीय अनोळखी इसमाचा मृतदेह आढळून आला. याबाबतची माहिती नागरिकांनी पोलिसांना दिली.

माहिती मिळताच पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक रेवण कदम हे आपल्या चमूसह घटनास्थळी पोहोचले. रितसर पंचनामा करून मृतदेह शवचिकित्सेसाठी ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आला. पुढील तपास पोलिस करीत असून, मृत अनोळखी इसमाबद्दल कुणालाही काही माहिती असल्यास नागरिकांनी पोलिस ठाण्यात संपर्क साधावा, असे आवाहन पोलीसांकडून करण्यात आले आहे.

# शहराच्या विकासाकरीता कटिबध्द

## - नगराध्यक्ष योगेश मिसार

ब्रम्हपुरी/का.प्र.

शहराचा सर्वांगीण विकास व्हावा, मूलभूत सोयी, रस्ते, वृक्ष लागवड, नाली बांधकाम, ओपन स्पेसचे सौंदर्यिकरण आदी विविध विकासात्मक कामे करण्यास नगर परिषदेत निवडून आलेले पदाधिकारी कटिबद्ध आहेत, असे उद्गार नवनिर्वाचित नगर परिषद अध्यक्ष योगेश मिसार यांनी काढले.



ब्रम्हपुरी शहरातील देलनवाडी प्रभागातील उराडे पेट्रोल पंपामागील स्वामी विवेकानंद शिक्षक कॉलनीतर्फे आयोजित सत्कार समारंभात ते बोलत होते. महिलांच्या हळदी कुंकू कार्यक्रमाचे औचित्य साधून नगराध्यक्ष योगेश मिसार, उपाध्यक्ष डॉ. नितीन उराडे, नगरसेविका पुष्पलता पोपटे, नगरसेवक सतीश हुमणे, स्वीकृत सदस्य वखार खान, पुष्पांकर बागरे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी मोठ्या प्रमाणात शिक्षक कॉलनीतील स्त्री पुरुष उपस्थित होते. सत्कारप्रसंगी उपाध्यक्ष नितीन उराडे, सुधाकर पोपटे, पुष्पांकर बांगरे, यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे संचलन जगदीश मेहेर यांनी तर प्रास्ताविक प्रमोद गजपुरे यांनी केले. या दिवसाचे औचित्य साधून महिलांच्या विविध स्पर्धा, नृत्य, मनोरंजनात्मक खेळ, उखाणे स्पर्धा घेण्यात आल्या. हा संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महिला मंडळी व पुरुष मंडळी यांनी सहकार्य केले.

# भालेश्वर येथे भव्य यात्रा व गोपालकाला संपन्न

## सत्यपाल महाराज यांच्या किर्तनाने प्रबोधनाची मेजवानी

ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी तालुक्यातील चिमूर विधानसभा क्षेत्रांतर्गत येणाऱ्या भालेश्वर येथे मकर संक्रांतीच्या शुभ पर्वावर शिवलिंग बालीपुत्र नवनाथ मंदिर देवस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य यात्रेचे आणि गोपालकाल्याचे उत्साहात आयोजन करण्यात आले. या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे 'सप्त खंजिरी' निर्माते तथा राष्ट्रीय समाज प्रबोधनकार सत्यपाल महाराज यांचे जाहीर समाज प्रबोधनपर कीर्तन संपन्न झाले.



या कार्यक्रमाला महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे महासचिव तथा चिमूर विधानसभा क्षेत्राचे समन्वयक डॉ. सतीश वारजूकर यांनी प्रामुख्याने उपस्थिती दर्शविली. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना डॉ. वारजूकर म्हणाले की, 'धार्मिक उत्सवांच्या माध्यमातून समाज प्रबोधनाची जोड देणे ही काळाची गरज आहे. सत्यपाल महाराजांसारख्या थोर विचारवंतांच्या कीर्तनातून मिळणारा संदेश तरुणांनी आपल्या जीवनात आचरणात आणल्यास समाजाची प्रगती निश्चित आहे.' कार्यक्रमाच्या मंचावर अनेक दिग्गज नेत्यांची व मान्यवरांची मांदियाळी होती. यामध्ये प्रामुख्याने प्रमोद चिमूरकर (माजी जिल्हा परिषद सदस्य), खेमराज तिडके (अध्यक्ष, ब्रह्मपुरी तालुका काँग्रेस कमिटी), नेताजी मेश्राम (अध्यक्ष, चिमूर विधानसभा ब्रह्मपुरी विभाग), वामन मिसार (अध्यक्ष, किसान सेल), गुड्डू बगमारे (उपाध्यक्ष, काँग्रेस कमिटी), सुरेश दुनेदार (सरपंच, ग्रामपंचायत पिंपळगाव), सुधीर शिवरकर (काँग्रेस नेते) आदी मान्यवरांचा समावेश होता.

प्रसंगी सत्यपाल महाराजांनी आपल्या खास शैलीत आणि सप्त खंजिरीच्या निनादात अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसनमुक्ती आणि शिक्षण या विषयांवर प्रकाश टाकला. त्यांच्या प्रबोधनात्मक कीर्तनाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. यात्रेनिमित्त आयोजित गोपाळकाल्याच्या कार्यक्रमाला भालेश्वर व परिसरातील भाविकांनी आणि ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी देवस्थान समितीचे पदाधिकारी आणि ग्रामस्थांनी मोलाचे सहकार्य केले. या उत्सवामुळे भालेश्वर परिसरात भक्तीचे आणि उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

ब्रम्हपुरी समाचारच्या
अंकाकरीता
www.bramhapuri
samachar.com/bs
या ऑनलाईन
साईटला भेट द्या
बातम्यांकरीता संपर्क :
मो. 9503100964
मो. 8275715315

# जि.प. उच्च प्राथ. शाळा, चोरटी

## तालुकास्तरीय नवरत्न स्पर्धेत अव्वल

ब्रह्मपुरी/का.प्र.

तालुकास्तरीय नवरत्न स्पर्धा नुकतीच नांदगाव जाणी येथे पार पडली. यात जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा चोरटी येथील तीन विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. चित्रकला स्पर्धेत अक्षरा दिलीप राऊत, स्मरणशक्ती स्पर्धेत नक्षम किशोर मेश्राम तर भाषण स्पर्धेत श्रुती भीमराव सोनडवले विद्यार्थी प्रथम क्रमांकाची मानकरी ठरलेत.

या तिन्ही विद्यार्थ्यांचे अभिनंदन शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजेश खरकाटे, मुख्याध्यापिका डॉ. अनिता विखार, सहा.शिक्षक हर्षवर्धन गायधने, हिवराज बनकर, ज्ञानेश्वर सिंधपुरे, धनराज सुरपाम व सर्व शालेय व्यवस्थापन समितीच्या सदस्यांनी तसेच गावकऱ्यांनी केलेले आहे.

**जल है तो कल है...**

# ब्रम्हपुरी शहर युवक काँग्रेसची कार्यकारिणी जाहीर

## शहर युवक काँग्रेसच्या अध्यक्षपदी अनुकूल शेंडे



ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी शहर युवक काँग्रेसची नवनियुक्त कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये युवक काँग्रेसच्या शहर अध्यक्षपदी अनुकूल शेंडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर नियुक्तीचे पत्र नुकतेच त्यांना कॉंग्रेस पक्षश्रेष्ठींच्या हस्ते प्रदान करण्यात आले आहे.

अनुकूल शेंडे हे ब्रम्हपूरी नगरपरिषदेचे नवनिर्वाचित नगरसेवक असुन फुले, शाहु, आंबेडकरी चळवळीतील अग्रगण्य युवा नेतृत्व आहेत. त्यांची समाजसेवेप्रती असलेली तळमळ बघता त्यांना ब्रम्हपूरी शहर युवक काँग्रेसचे अध्यक्षपदी नियुक्त करण्यात आले आहे. तर कार्याध्यक्षपदी कुशल युवा नेतृत्व रवी पारधी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. उपाध्यक्षपदी सुयांशू अलोने, सचिवपदी डेनी शेंडे, सरचिटणीसपदी प्रिन्स नंदुरकर व शुभम कावळे, कोषाध्यक्ष पदी सुरज मेश्राम यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर सदस्यपदी सोयक सय्यद, रुमदेव कुर्झेकर, मनीष पारधी, शशांक उपासे, राहुल वठे, शहबाज खान, मयुर वाढई, आदित्य खांडेकर, राहुल नेवारे, दिपक दिघोरे, अनिकेत प्रभाकर बांगरे, खुशाल रमेश गजपुरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

नियुक्ती पत्र प्रदान करतांना तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष खेमराज तिडके, शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हितेंद्र राऊत, जिल्हा काँग्रेस उपाध्यक्ष तथा नगरसेवक मोंटु पिलारे, युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सोनू नाकतोडे यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# लक्ष्य फिजिकल अकॅडमीचा वर्धापन दिन साजरा

ब्रह्मपुरी/का.प्र.

रविवार, दिनांक १८ जानेवारी २०२५ ब्रह्मपुरी येथील लक्ष्य फिजिकल अकॅडमीच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित औपचारिक कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्ते विहार मेश्राम यांच्या हस्ते अकॅडमीचे संचालक प्रफुल्ल नागापुरे यांचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राध्यापक परकरवर सर होते.

या कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक वालदे सर, भाऊराव राऊत सर, संचालक प्रफुल्ल नागापुरे सर, अनिल मेंढे, आशिष पुरकाम, प्रणव सूर्यवंशी आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी अकॅडमीतील तसेच परिसरातील मोठ्या संख्येने विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होत्या. याप्रसंगी मार्गदर्शनपर भाषण करताना विहार मेश्राम यांनी स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी शारीरिक क्षमता, शिस्त व सातत्य यांचे महत्त्व अधोरेखित केले. ग्रामीण व निमशहरी भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार प्रशिक्षण व योग्य मार्गदर्शन देण्याचे कार्य लक्ष्य फिजिकल अकॅडमी प्रभावीपणे करत असल्याचे त्यांनी नमूद केले.

सत्काराला उत्तर देताना संचालक प्रफुल्ल नागापुरे यांनी अकॅडमीच्या माध्यमातून युवकांना पोलीस, सैन्य व अन्य सेवा क्षेत्रासाठी सक्षम घडविण्याचा संस्थेचा दृढ संकल्प व्यक्त केला.

# जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनीत ख्रिस्तानंदच्या 'ओंकार'चे यश

ब्रह्मपुरी/का.प्र.

जिल्हा परिषद चंद्रपूर शिक्षण विभाग (माध्यमिक) व पंचायत समिती चिमूर यांच्या अंतर्गत तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंग यांच्या मार्गदर्शनाने ५३ वे जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन सेंट क्लेरेट स्कूल चिमूर येथे नुकतेच पार पडले.

सदर प्रदर्शनी मध्ये जिल्ह्यातील १५ तालुक्यामधील प्राथमिक गटातील व माध्यमिक गटातील विविध विद्यार्थ्यांनी आपल्या वैज्ञानिक प्रतिकृतीसह प्रदर्शनी मध्ये सहभाग घेतलेला होता. या प्रदर्शनीमध्ये वर्ग ९ वी ते १२ वी च्या माध्यमिक गटात ख्रिस्तानंद स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज ब्रह्मपुरी येथील वर्ग




दहावीचा विद्यार्थी ओंकार प्रमोद दिघोरे याने जिल्ह्यातून प्रथम क्रमांक प्राप्त केला. त्याने 'रोड वाइल्ड मिल' या संकल्पनेवर आधारित वैज्ञानिक प्रतिकृती तयार केलेली होती. समारोपीय कार्यक्रमामध्ये मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन ओंकारचा गौरव करण्यात आला. राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनी श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती संचालित विज्ञान महाविद्यालय काँग्रेस नगर, नागपूर येथे होणार असून ओंकार चंद्रपूर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. ओंकारला मार्गदर्शक म्हणून शाळेतील विज्ञान शिक्षिका संगीता निखारे व लेकराम डेंगे यांचे सहकार्य लाभले.

त्याच्या यशाबद्दल ब्रम्हपुरी पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी डॉ.विद्या शेळके, शाळेचे व्यवस्थापक फादर कुरिअन, मुख्याध्यापिका सिस्टर पावना उपमुख्याध्यापिका सिस्टर अंजली तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कौतुक केले आहे.

# ने.हि. कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रा. प्रफुल्ल पराते यांचे राज्यस्तरीय स्पर्धेत घवघवीत यश

## एमएस-वर्ड आणि एमएस-एक्सेल स्पर्धेत चमकदार कामगिरी



ब्रम्हपुरी/का.प्र.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र (SCERTM), पुणे द्वारा शिक्षणक्षेत्राशी संबंधित शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांचेतील कौशल्य व नवकल्पना विकसित करण्याच्या उद्देशाने सत्र २०२५-२६ पासून 'शिक्षक व अधिकारी/कर्मचारी स्पर्धा' चे आयोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत डाअट, आंबेजोगाई जि. बीड द्वारा घेण्यात आलेल्या MS-Word आणि MS-Excel राज्यस्तरीय स्पर्धेत नेवजाबाई हितकारिणी कनिष्ठ महाविद्यालय, ब्रम्हपुरी येथील प्रा. प्रफुल्ल देवराव पराते यांनी आपल्या अभ्यासपूर्ण सादरीकरणाने राज्यात राज्यस्तरीय स्पर्धेचे विजेते होण्याचा बहुमान प्राप्त केला.

संगणक विषयातील त्यांच्या सातत्यपूर्ण परिश्रमांमुळे व तांत्रिक कौशल्यामुळे त्यांनी ही उल्लेखनीय कामगिरी साध्य केली आहे.

प्रा. प्रफुल्ल पराते यांचे राज्यस्तरीय स्पर्धेतील यशाबद्दल नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेच्या अध्यक्ष श्रीमती स्नेहलताबाई भैया, सचिव अशोकजी भैया व संस्थेचे सर्व पदाधिकारी, प्राचार्य डॉ. सुभाष शेकोकर, पर्यवेक्षक प्रा. आनंद भोयर आई-वडिल, पत्नी खूशी पराते, बहिण ममता उमरेडकर तथा शिक्षकवृंद व प्रशासकीय कर्मचारीवृंद यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# बिटस्तरीय कबड्डी स्पर्धेत वांद्रा शाळा अव्वल

ब्रम्हपुरी/का.प्र.

सत्र २०२५-२०२६ करीता दिनांक १६ ते १८ जानेवारी २०२६ ला बिटस्तरीय शालेय बालक्रीडा स्पर्धा तथा सांस्कृतिक सम्मेलन बीट मुडझा अंतर्गत कोसंबी (खड) येथे घेण्यात आल्या. या स्पर्धेत वांद्रा शाळेतील विद्यार्थ्यांनी कबड्डी स्पर्धेत आणि विविध स्पर्धेत भाग घेऊन मुले - मुली यांनी बीटातून प्रथम क्रमांक पटकविला.

कबड्डी खेळामध्ये वांद्रा शाळेतील माध्यमिक स्तरावरील मुलांचा व मुलींच्या संघाने प्रथम क्रमांक, प्राथमिक स्तरावरील मुलांचा संघ प्रथम क्रमांक तर प्राथमिक मुलींच्या संघाने द्वितीय क्रमांक पटकाविला. माध्यमिक विभागातील जनरल चॅम्पियनशिप ही जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वांद्रा ला मिळाली त्याचप्रकारे विविध स्पर्धेमध्ये प्रथम तथा द्वितीय क्रमांक पटकावला. अशाप्रकारे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वांद्रा च्या सर्व मुला मुलींनी उत्कृष्ठ खेळाचे प्रदर्शन केल्याबद्दल ग्राम पंचायतचे पदाधिकारी व गावातील पालक, शाव्यस अध्यक्ष नितिन कीनेकार यांनी सुद्धा विद्यार्थ्यांचे भरभरुन कौतुक केले.

**... QUOTES ...**

"It is often the small steps, not the giant leaps, that bring about the most lasting change."

- Queen Elizabeth II

**चारोळी**

शाळेत तो चुकला की
मास्तर त्याला नेहमी कोंबडा करायचा...
त्याला मग बर्डफ्लू झाला,
मास्तर आता तशी चूक नाही करायचा...

रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल

# एलएमबी स्कुलमध्ये Kite Making Activity



ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील एल. एम. बी. पब्लिक स्कुलच्या प्रि-स्कुलच्या विभागातील विद्यार्थ्यांकरिता मकरसंक्रांतीच्या शुभ मुहूर्ताचे औचित्य साधून १३ जानेवारी २०२६ ला Kite Making Activity चे आयोजन करण्यात आले.

महाराष्ट्रात पतंगाचा खेळ मुलांमध्ये अतिशय प्रिय आहे. विशेष म्हणजे संक्रांतीला पतंग उडविण्याची प्रथा आहे. Kite Making Activity च्या माध्यमातून चिमुकल्यांना पतंग कशाप्रकारे बनविली जाते याचे मार्गदर्शन करण्यात आले. पतंग उडविणे हा एक आकर्षक क्रिडा प्रकार आहे व त्यासाठी विशेष कौशल्याची गरज असते. ह्याचे मार्गदर्शन करण्यात आले. वेगवेगळ्या रंगाच्या कागदांपासून पतंग तयार करण्यात आले. यावेळी चिमुकल्यांनी तिळगुळ व गोड पदार्थ खाऊन मकरसंक्रांती उत्साहात साजरी केली.

यावेळी शाळेच्या संचालिका आशिता भैया मॅडम यांनी विद्यार्थ्यांनी बनविलेल्या आकर्षित अशा पतंगाचे व कलाकृतीचे कौतुक करून अभिनंदन केले. या उपक्रमाच्या यशस्वीतेकरीता सर्व प्रि-स्कुलच्या शिक्षिकांचे सहकार्य लाभले.



Miracle constructions & Developers
श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
सिंदेवाही
नवरगांव
तळोधी
चंद्रपुर (चौराळा)
संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.

प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337
सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स

गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.



# ब्रम्हपुरी काँग्रेसमध्ये नाराजी नाट्य!

## सभापती निवडीवर ६ नगरसेवकांचा बहिष्कार; राजकीय भुकंपाची शक्यता!

ब्रम्हपुरी /का.प्र.

ब्रम्हपुरी नगरपरिषदेच्या विषय समिती सभापतींची निवड प्रक्रिया पार पडली असली, तरी या निवडीने सत्ताधारी काँग्रेस पक्षातील अंतर्गत कलह चव्हाट्यावर आणला आहे. पाचही सभापतींची अविरोध निवड झाली असली, तरी पक्षाच्या २१ पैकी ६ नगरसेवकांनी या प्रक्रियेकडे पाठ फिरवल्याने शहराच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ माजली आहे.

२० जानेवारी रोजी पार पडलेल्या विशेष सभेत काँग्रेसच्या पाचही सभापतींची बिनविरोध निवड करण्यात आली. पालिकेत काँग्रेसचे स्पष्ट बहुमत असून २१ नगरसेवक सोबतीला आहेत. मात्र, या अत्यंत महत्त्वाच्या दिवशी २१ पैकी केवळ १५ नगरसेवक उपस्थित होते. स्वतः नवनिर्वाचित पाणी पुरवठा सभापतींसह सहा नगरसेवक अनुपस्थित राहिल्याने 'विजयाचा आनंद की नाराजीचा सूर?' असा प्रश्न उपस्थित होत आहे.

**अनुपस्थित राहणारे 'ते' सहा नगरसेवक कोण?**

सभेला दांडी मारणाऱ्यांमध्ये सतिश हुमने (नवनिर्वाचित पाणी पुरवठा समिती सभापती), अनुकूल शेंडे, प्रकाश खोब्रागडे, गीता मेश्राम, पुष्पलता पोपटे, व हेमलता सिंहगडे प्रमुख नावांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, सतिश हुमने यांची सभापती म्हणून निवड होऊनही त्यांनी सभेला अनुपस्थित राहणे, हे राजकीय विश्लेषकांच्या भुवया उंचावणारे ठरले आहे. पक्षश्रेष्ठींनी या नगरसेवकांना काही आश्वासने दिली होती. मात्र, सभापती निवडीच्या वेळी या शब्दाचे पालन झाले नसल्याचा आरोप या गटाकडून केला जात आहे. नाव न सांगण्याच्या अटीवर या गटातील एका सदस्याने सांगितले की, 'पक्षाने दिलेल्या शब्दाला जागले नाही, म्हणूनच आम्ही आमची नाराजी या माध्यमातून व्यक्त केली आहे.'

**भविष्यात राजीनामा सत्र?**

या ६ नगरसेवकांच्या बंडखोर पवित्र्यामुळे ब्रम्हपुरी काँग्रेसमध्ये भविष्यात मोठी उलथापालथ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. ही अनुपस्थिती केवळ नाराजी नसून, एका मोठ्या राजकीय संघर्षाची नांदी मानली जात आहे. शहरात अशी चर्चा सुरू आहे की, जर पक्षश्रेष्ठींनी या नाराजीची वेळीच दखल घेतली नाही, तर लवकरच 'राजीनामा सत्र' सुरू होऊ शकते. ब्रम्हपुरीच्या या राजकीय नाट्यामुळे विरोधकांच्या हाती आयते कोलीत मिळाले असून, आता काँग्रेसचे स्थानिक नेते ही 'डॅमेज कंट्रोल' कशी करतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# गर्दीचा फायदा घेत महिलेचे...

(पान क्र. १ वरून)

असलेली पर्स लंपास केली. चोरीला गेलेल्या सोन्याच्या दागिन्यांची अंदाजे किंमत ३ लाख ७५ हजार रुपये असून, मोबाईल व रोख रकमेसह एकूण ३ लाख ७७ हजार ५०० रुपयांचा ऐवज चोरीला गेला आहे. ब्रम्हपुरी पोलिसांनी याप्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. बसस्थानकावरील वाढत्या गर्दीचा फायदा घेणाऱ्या टोळ्या सक्रिय झाल्या असल्याने प्रवाशांनी आपल्या दागिन्यांची व मौल्यवान वस्तूंची काळजी घ्यावी, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# ब्रम्हपुरी शहरात काँग्रेस पक्षाचा...

(पान क्र. १ वरून)

सुरुवातीला नगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेतून (General Body) प्रत्येक समितीसाठी सदस्यांची निवड करण्यात आली. त्यानंतर, या सदस्यांमधून सभापतींची नावे निश्चित करून त्यांच्या निवडीची अधिकृत घोषणा पीठासन अधिकाऱ्यांनी केली.

**हे आहेत ब्रम्हपुरीचे नवे 'पंचप्राण' (सभापती) :**

शहराचा कायापालट करण्याची जबाबदारी असलेल्या पाच महत्त्वाच्या समित्यांवर खालील नगरसेवकांची वर्णी लागली आहे:

**सार्वजनिक बांधकाम समिती:** डॉ. नितीन उराडे (सभापती)

**सार्वजनिक आरोग्य समिती:** मनोज कावळे (सभापती)

**नगररचना व नियोजन समिती:** साचिन राऊत (सभापती)

**पाणीपुरवठा व जलनिस्सारण समिती:** सतीश हुमने (सभापती)

**महिला व बालकल्याण समिती:** बबीता आमले (सभापती), ज्योती राऊत (उपसभापती).

नगराध्यक्षांसह २१ नगरसेवकांचे बलाढ्य संख्याबळ असल्याने, काँग्रेस पक्षाने या निवडीमध्ये अत्यंत समन्वय राखला. कोणताही वाद न होता अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात ही प्रक्रिया पार पडली. शहराचा वाढता विस्तार लक्षात घेता, स्वच्छ आरोग्य, शुद्ध पाणीपुरवठा आणि शिस्तबद्ध नगररचना या कामांना हे नवनियुक्त सभापती प्राधान्य देतील, अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे.

निवड प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पीठासन अधिकारी तथा मुख्याधिकारी डॉ. माधुरी सलामे यांनी सर्व नवनियुक्त सभापतींचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले व पुढील प्रशासकीय कामकाजासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी नगरपालिकेतील नवनिर्वाचित नगरसेवक, अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या

नियमित वाचा.. अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचार


बुधवार बंद
दुकानाची वेळ सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता


Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404